**दिवाणी** किरकोळ अर्ज **क्र. १८४/२०२५**

**प्रभाकर वि. निरंक**

**नि.क्र. ०९ खाली**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा कागदपत्रांना निशाणी देण्याकरिता पुढील सरतपास अर्जदारतर्फे वकील श्री.पी.बी.वाकडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु –**

माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. आण्णासाहेब हे माझे वडील होते त्यांचा दि. ०४/१२/२०२४ रोजी मृत्यु झालेला आहे व अंजनाबाई बापाजी नरके ही माझी आजी होती, तिचा मृत्यु झालेला आहे. अर्जदार क्र. २ पार्वताबाई आण्णासाहेब नरके ही माझी आई आहे. माझ्याशिवाय माझे वडीलांना कोणीही अपत्य नव्हते. त्यामुळे त्यांच्या मृत्यु पश्चात मी व माझी आई असे दोनच कायदेशीर वारस आहोत. आता मला निशाणी क्रमांक ४ च्या यादी खाली दाखल केलेले माझे वडील यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखवले. अपलोड केलेले मृत्युप्रमाणपत्र आज आणले आहे ते मुळ प्रमाणे असल्यामुळे त्यास **निशाणी क्र.११** देण्यात आले. तसेच माझी आजी अंजनाबाई हिच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचे अनुउपलब्धता प्रमाणपत्र दाखविले. अपलोड केलेले मुळ प्रमाणे असल्यामुळे त्यास **नि.क्र.१२** देण्यात आला. आता मला सर्व अर्जदारांचे आधारकार्ड दाखवले. अपलोड केलेले आधारकार्ड हे आज सोबत आणलेल्या मुळ आधारकार्ड प्रमाणे असल्यामुळे त्यास **नि.क्र.१३ व १४** देण्यात आले. आता मला नि.क्र.१० च्या यादी खाली दि.१९/११/२०२५ रोजी या प्रकरणाच्या नोटीसचे जाहिर प्रकटन झाल्याने वर्तमानत्र दाखवले. ते 'दैनिक मराठवाडा केसरी' या वृत्तपत्राचा अंक आहे. त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात आले.

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2026.03.12 17:21:20 +0530

दि.१२/०३/२०२६

(जी.व्ही.गांधे)

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पैठण